जनता सहकारी बँक लि., पुणे
(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)
अमृत महोत्सव विशेषांक

१९४९ - २०२४ बँकिंग सेवेचे गौरवशाली अमृत महोत्सवी वर्ष
जनता सहकारी बँक लि., पुणे

# गरुड झेप

( **जनता सहकारी बँक लि., पुणे** द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी )

## बँकेच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे

- १९४९: १८ ऑक्टोबर बँकेची स्थापना
- १९५७: शिवाजीनगर शाखा कार्यान्वित
- १९६२: भोर शाखा प्रारंभ
- १९६३: तळेगाव व घोडनदी शाखा सुरु
- १९६६: या वर्षात सात शाखांची सुरुवात
- १९७४: रौप्य महोत्सवी वर्ष
- १९७८: रत्नागिरी अर्बन बँक विलीनीकरण
- १९८८: बँकेला शेड्युल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला
- १९९७: डिपॉझिटरी पार्टीसिपंट म्हणून मान्यता
- १९९९: ग्राहक सेवेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष
- २००५: कोअर बँकिंग प्रणाली व डेटा सेंटर सुरु ISO 9001, 27001 मानांकने प्राप्त
- २०१०: रु.५००० कोटी एकत्रित व्यवसाय पूर्ण
- २०१२: खेडब्रम्हा नागरी बँकेचे विलीनीकरण व मल्टीस्टेट बँकेचा दर्जा प्राप्त
- २०१४: रु.१०००० कोटी एकत्रित व्यवसाय पूर्ण
- २०१६: चौंडेश्वरी सहकारी बँकेचे विलीनीकरण
- २०२३: ७१ शाखा, १० लाख समाधानी ग्राहक. रु.१४,२८६.८८ कोटी एकत्रित व्यवसाय




## अध्यक्षांच्या लेखणीतून

सन्माननीय सभासद, खातेदार, हितचिंतक, सेवक यांना शारदीय नवरात्रोत्सवाच्या व दि. १८ ऑक्टोबर पासून सुरु होणाऱ्या बँकेच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. ७५ वर्षांच्या प्रवासात सुरुवातीच्या काळात सहकारी बँक म्हणून अस्तित्व निर्माण करणे, सहकाराच्या भावनेचा विस्तार, पारदर्शक कारभारातून विश्वास निर्मिती, शाखा विस्ताराचा विचार करताना शहरी भागात, तालुक्याच्या ठिकाणी, कृषिपूरक भागांमध्ये असे अनेक आयाम समोर येतात.

मुख्य कचेरी असलेल्या शहराच्या बाहेर शाखा विस्तार करणारी बँक, राष्ट्रीयकृत बँकाप्रमाणेच व्यावसायिक ग्राहकांना कर्जविषयक सुविधा उपलब्ध करणारी, नागरी बँक क्षेत्रात अन्य नागरी बँकेचे विलीनीकरण करून ठेवीदारांचा सहकारी बँकिंग बद्दल विश्वास कायम ठेवणारी बँक अशी अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. शाखा विस्तार, व्यवसाय वाढ, उत्तम ग्राहक सेवा, नाविन्यपूर्ण सेवा याबरोबरीने येऊ घातलेल्या तंत्रज्ञानाचा स्वीकार, तत्रज्ञान आधारित (टेक्नोबेस) सेवा ग्राहकांना सहज उपलब्ध होण्यासाठीचे प्रयत्न, डीमॅट सेवेमध्ये देशातील प्रथम डीपॉझीटरी पार्टीसिपंट म्हणून मिळवलेला मान, स्थापनेपासून सर्वात कमी काळात शेड्युल्ड बँकेचा दर्जा मिळवणारी बँक यांचा उल्लेख क्रमप्राप्त आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपल्या बँकेने मार्च २०२३ वर्षअखेर रु. १४,२०० कोटींपेक्षा जास्त व्यावयायिक उलाढाल पूर्ण केली आहे. सहकार क्षेत्रात तसेच बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मधील तरतुदी, अद्ययावत तंत्रज्ञान अंगीकारत, विविध कौशल्ये आत्मसात करीत, आपली बँक समर्थपणे प्रगतीच्या वाटेवर वाटचाल करेल असा विश्वास व्यक्त करतो. ७५ वर्षांच्या प्रवासात सभासद, खातेदार, हितचिंतक, यांनी दिलेला पाठींबा, सहकार्य याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो, आपले बँकेवर प्रेम आहेच ते वर्धिष्णू होत राहो अशी आपणास विनंती करतो. बँकेच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या मंगल प्रसंगी आपणा सर्वांचे ह्दयापासून आभार, कृतज्ञता अणि खूप खूप धन्यवाद!

**रविंद्र हेजीब**
अध्यक्ष

# ● क्षणचित्रे ●



रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त खातेदारांच्या औद्योगिक उत्पादनांची प्रदर्शनी



सहकार मंत्री श्री.यशवंतराव मोहिते, संचालक मंडळातील सदस्य समवेत श्री.दत्तोपंत जमदग्नी



१८ मे १९७८ श्री.बाळासाहेब देवरस यांची बँकेस सदिच्छा भेट




८ ऑक्टो.१९८३ भोर शाखा भूमिपूजन समारंभ आमदार श्री.अनंतराव थोपटे यांच्याहस्ते



मा. श्री. मोरोपंत पिंगळे यांची बँकेस सदिच्छा भेट



गृहमंत्री मा.श्री.शंकरराव चव्हाण यांची बँकेस सदिच्छा भेट




१० मे १९९७ लातूर शाखा स्थलांतर कार्यक्रम शुभहस्ते मा.श्री.मुरलीमनोहर जोशी,
उपस्थित मा.श्री.अशोकराव कुकडे, श्री.दामले व श्री.मिरासदार




मा.श्री. विलासराव देशमुख मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य वर्धापन दिन कार्यक्रमात

# • क्षणचित्रे •



हिंदूह्रदय सम्राट मा.बाळासाहेब ठाकरे मार्गदर्शन करताना. उपस्थित श्री.वसंतराव आपटे श्री.माणिकराव पाटील




सुवर्ण महोत्सवी शुभारंभ कार्यक्रम उपस्थित मा.श्री.मोरोपंत पिंगळे, सहकार आयुक्त श्री.सुभाष लाला



सहकार आयुक्त श्री.सुभाष लाला यांच्या हस्ते प्रथम कार्यकारी संचालक श्री.दत्तोपंत जमदग्नी यांचा सत्कार



२५ जाने.१९९३ शिवाजीनगर रत्नागिरी शाखा नूतन वास्तूत स्थलांतर



मा.श्री.गोपीनाथजी मुंडे यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री.खळदकर साहेब




डेटा सेंटर उद्घाटन समारंभ शुभहस्ते मा.श्री.शरदराव पवार व मान्यवर




आयएसओ मानांकन प्रदान कार्यक्रम शुभहस्ते डॉ. विजय भटकर, उपस्थिती श्री.अजित निंबाळकर, श्री. विजय भावे व श्री. श्रीधर घाटे




विलीनीकृत खेडब्रम्हा शाखा उद्घाटन समारंभ

# ● क्षणचित्रे ●




प.पू. सरसंघचालक मा. श्री.मोहनजी भागवत आनंद सोहळ्यात मार्गदर्शन करताना





चौंडेश्वरी सह. बँक, इचलकरंजी विलीनीकरण समारंभ उपस्थित मा.श्री.चंद्रकांतदादा पाटील



मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना



महाराष्ट्र भूषण मा.श्री.बाबासाहेब पुरंदरे यांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार करताना श्री.खळदकर




नवल वर्तले पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद  प्रकाशित करताना मा.श्री.राम नाईक




मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रदान करताना मा.श्री. लेले व मा.संचालक




कोविड काळात समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारताना मा.श्री.माटे, श्री. कश्यप, श्री.काकतकर व श्री.केतन भागवत



मा.श्री.सतिशजी मराठे संचालक, रिझर्व बँक ऑफ इंडिया, मा.श्री.जोतिंद्रभाई मेहता अध्यक्ष नॅफकॅब यांची बँकेस सदिच्छा भेट. उपस्थित मा.श्री.रविंद्र हेजीब व मान्यवर



**Shri. Satish Marathe**
Founder Member, Sahakar Bharati
Director, Reserve Bank of India
Director, Ntl Housing Bank

# Time To Re Engineer, Time To Re Invent

UCBs have a history of over 120 years in Bharat. These small Banks primarily grew in numbers in the erstwhile Bombay State in pre-Independence era. And as a consequence, even today, about 60% of the UCBs of the Country are in the States of Gujarat, Maharashtra & Karnataka.

Initially UCBs were totally regulated and managed under the respective State CoOp Acts and the size and the scale of its operations and reach remained small, even though the influence of UCBs was substantial.

However, Banking Scenario started changing after the formation of Deposit Insurance Corporation (DIC) in the year 1962. Initially, Deposit Insurance Cover was not made available to Depositors of the UCBs as these Banks were not being regulated by RBI. There was a huge hue & cry with a demand to extend Deposit Insurance Cover to the UCBs. Hence, in 1966, BR Act, 1949 was made applicable to UCBs with certain exemptions. As a result, these Banks were only partially brought under the Regulatory and Supervisory framework of RBI.

Extension of Deposit Insurance Cover made a big impact and the UCBs grew in number, and also their volume of business increased to a great extent. This situation brought forth a variety of challenges which continue to haunt the UCB Sector even today.

Till a few decades back, the UCB Sector had a chequered history of extending financial services to lower and middle income groups, small traders, selfemployed and Small-Scale Industries (SSIs) mainly in Urban & Semi Urban Areas.

However, as the UCBs grew in size and started taking bigger exposures, the financials of many Banks deteriorated with rising levels of NPAs and losses. Unfortunately, today we find a large number of UCBs under stress and some of them under severe stress. Sadly, the Sector is today bogged down with numerous low rated UCBs. Besides, many UCBs are under SAF & AID Regulatory Prescriptions of the RBI. Over 200 UCBs have also been found wanting and consequently have been penalised by the Regulator.

In larger interests of the Depositors, this situation needed to be corrected and after much persuasion, particularly, by Sahakar Bharati and also by RBI, BR Act 1949 was amended in 2020 and RBI was fully empowered to Regulate and Supervise the UCBs, as it does for the entire Banking Sector. This is the new Dawn of an Era for the revival and orderly growth of the UCB Sector.

It is on this background, the UCBs need to chart a course correction strategy mainly

focused to emerge as Financially Sound & Well Managed Banks.

Due to the GOI's policies of promoting Growth and Development across 360 Degrees and despite Volatility and Geopolitical Challenges, Bharat's Economy has emerged as the 5th largest and fastest growing Economy in the World. To continue the growth trajectory, Bharat needs a strong & vibrant Financial Ecosystem.

The UCBs are today fully integrated with the mainstream Banking and Financial Ecosystem. Hence, No Govt, No Regulator would anytime like to have any of the segment of financial ecosystem to be weak which can cause disruptions. It is therefore, all the more necessary for the UCB Sector to improve its working by implementing Regulatory Guidelines.

In this Age of VUCA - Volatility, Uncertainty, Complexity & Ambiguity, the task of running a Bank is all the more challenging and this calls for more efforts.

In view of the above, and because of GOI's now commitment to **Sahakarita Se Samrudhi**, UCB Sector is today best positioned to set its house in order and emerge stronger due to friendlier and supportive Policy framework. On this background, UCBs can emerge as a strong financial sector to lend its mite to the Country's Growth Momentum.

For this the UCBs need to -

A. Adopt Good Governance Practices alongwith SOPs, Transparency and Adequate Disclosures in its operations, etc
B. Board to mainly formulate Vision and Mission Statements and concentrate on Policy Framing
C. Remain well Capitalised at all times and to raise Capital at regular intervals,
D. Create Risk Management Architecture to enable it to initiate early corrective steps,
E. Strengthen Oversight on every aspect of Operations through a robust Internal Audit system,
F. Adopt and implement Policy relating to Training & Capacity Building for all levels, including for Board Members,
G. Formulate Technology and Cyber Security Policy and allocate adequate Funds for Technology Upgradation, and
H. Formulate Succession Policy to ensure Sustainable and robust Growth, while ensuring continuity of Management Practices.

Over the years, Banking has become more technical and complex. Hence, qualified and experienced full-time executives should undertake day-to-day operations who should function within the laid down policies and guidelines of the Board.

Over the years, the UCB Sector has matured and it is for this reason, the Sector should wholeheartedly accept the time-tested Principle of Separation of Ownership & Management. The Board (read Owner Shareholders) led by the Chairman & the Management (read Full Time Executives) led by the CEO have to evolve a system to work in harmony for the larger good of all Stakeholders. Simultaneously, a Culture of Compliance has to be nurtured at all levels.


It is felt that CoOp Bankers will rise to the occasion and discharge its responsibilities towards the Country by promoting equitable and inclusive financial well being of the Countrymen.

•••••



# शुभसंदेश

## बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मा. अध्यक्ष यांनी मान्यवरांना पाठविलेल्या पत्रावर प्राप्त झालेले शुभसंदेश



### श्रद्धेय स्वामी गोविन्ददेव गिरि

कोषाध्यक्ष, श्रीरामजन्मभूमि तीर्थक्षेत्र (न्यास), अयोध्या

सर्वप्रिय अशी जनता सहकारी बँक आता अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करित अहे. हे कळून खूप आनंद वाटला. आपला देश सर्वार्थांनी सर्व क्षेत्रात गरुडझेप घेत उन्नती करित आहे. यात आर्थिक व समाजसेवेच्या विषयात आपल्या जनता सहकारी बँकेचे पण यथाशक्ती योगदान आहे.

बँकेची अशीच भरभराट होवून राष्ट्रसेवेत हि ती अग्रगण्य राहो अशी परमेश्वरचरणी प्रार्थना व सर्वविध उन्नतीसाठी बँकेस हार्दिक शुभकामना !

विजयी भव !



### मा. श्री. नितीनजी गडकरी

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री, भारत सरकार

जनता सहकारी बँक अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे, त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन, तसेच गेल्या ७५ वर्षांच्या वैभवशाली प्रवासाचा लेखाजोखा मांडण्यासाठी प्रकाशित होत असलेल्या 'गरुड झेप' या स्मरणिकेसाठी खूप खूप शुभेच्छा!

सहकारी बँक म्हटल्यावर तिचा थेट संबंध समाजातील गोरगरीब जनतेशी आणि मध्यमवर्गीयांशी येतो. गरजूंच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याची जबाबदारी सहकारी बँकांवर असते. गेली ७५ वर्षे आपले हे कार्य अविरत सुरु आहे, याचा मला अभिमान आहे. कुठल्याही संस्थेचा अमृत महोत्सवी प्रवास हा अनेक चढ-उतारांनंतर पूर्ण झालेला असतो. अशा सर्व परिस्थितीवर मात करुन आपण एका नव्या दिशेने वाटचाल करीत आहात, त्याचे कौतुक आहे. संस्थेला अमृत महोत्सवी वाटचालीसाठी आणि त्यानिमित्ताने आयोजित सर्व उपक्रमांसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!



### पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे

संस्थापक विश्वस्त विवेकानंद रुग्णालय, लातूर

आपली बँक 'अमृत महोत्सवी' वर्षात यशस्वीपणे पदार्पण करीत आहे, हे समजून आनंद वाटतो. मी बँकेची वाटचाल जवळून पहात आलो आहे. अनेक अडथळे, प्रतिकूलता, यावर मात करुन बँकेने सहकारी क्षेत्रात एक मापदंड निर्माण केला आहे. 'संघ' वृत्तीने चालणारे संचालक मंडळ, तत्पर कर्मचारी वर्ग आणि निष्ठावान ग्राहक वर्ग, यामुळे मोठे यश प्राप्त झाले आहे.

या क्षेत्रात बदलती आव्हाने आहेत. त्याला अनुसरुन, मूलभूत गुणधर्म जोपासत पुढील वाटचाल होत राहील, असा मला विश्वास वाटतो. केवळ सहकार अर्थक्षेत्रातच नव्हे, तर व्यापक समाजजीवन व राष्ट्रजीवन या मध्येही बँकेचा सहभाग वाढता रहावा.

यानिमित्ताने अधिक प्रभावी 'गरूडझेपेची' योजना व कार्यवाही व्हावी, ही शुभेच्छा ! सर्वांचे हार्दिक अभिनंदन.



### मा. श्री. सुरेश उर्फ भैय्याजी जोशी

अ. भा. कार्यकारिणी सदस्य
रा.स्व.संघ

जनता सहकारी बँक, पुणे ह्या वर्षी अमृत महोत्सवी वर्षात प्रवेश करित आहे व त्या निमित्ताने आपण 'गरुडझेप' स्मरणिका प्रकाशित करित आहात ही आनंदाची गोष्ट आहे. सहकाराच्या क्षेत्रात समाजाचा विश्वास व ह्या क्षेत्रात काही आदर्श, अनुकरणीय गोष्टी स्थापित व्हावे ही अपेक्षा असते, आपली बँक ह्या कसोटीवर यशस्वी सिद्ध झाली आहे.

ज्या ध्येयनिष्ठ व वैचारिक प्रतिबद्धता मानणाऱ्या व्यक्ति समूहाने ह्या प्रकल्पाचे बिजारोपण केले आहे त्याचे स्वरुप विशाल होणे हे स्वाभाविकच आहे. ह्या क्षेत्रातील आव्हाने मोठी आहेत, अनुकुल प्रतिकुल परिस्थितीची तमा न बाळगता वाटचाल सातत्याने करीत राहिले त्या सर्व व्यक्तित्वांना अभिवादन!

सहकार म्हणजे स्वाहाकार असा अनुभव येत असता 'सहकाराय समुद्धारिता' हा मंत्र जोपासला हेच आपले वैशिष्ट्य आहे. सर्व संचालक परस्पर सहकार्याने समाजाचा विश्वास संपादन करण्यात प्रयत्नशील राहिले आहेत. कितीही चिंतन, काटेकोर व्यवहार व शासनाच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अडचणी आल्या तरी ध्येयनिष्ठ, समर्पित समूह त्यावर मात करुन प्रगतीपथावर वाटचाल करीत राहतो.

भविष्यातही अशी वाटचाल होत राहो ह्याच शुभेच्छा!

सर्व संचालक, कर्मचारी, भागधारक ह्यांचे अभिनंदन!



### मा. श्री. सुहासराव हिरेमठ

अ. भा. कार्यकारिणी सदस्य
रा.स्व.संघ

आपल्या जनता सहकारी बँकेने अमृत महोत्सवी वर्षात प्रवेश केल्याचे ऐकून अतिशय आनंद झाला. मला आपल्या बँकेची माहिती १९७७ पासून आहे. पण १९८४ पासून जवळचा संबंध आला. राष्ट्रीय विचाराच्या मंडळींनी मनात सामाजिक जाणीव ठेवून आर्थिक व सहकार क्षेत्रात धाडसाने पाऊल टाकले. अनेक अडचणींना तोंड देत, त्यावर मात करत या क्षेत्रात एक आदर्श उदाहरण आज पर्यंत घेऊन गेलेल्या सर्व संचालक व पदाधिकाऱ्यांनी स्थापित केले. ईश्वरी शक्तीचे बळ ही लाभले ज्यामुळे सामान्य लोकांनी पूर्ण विश्वास आपल्या बँकेवर व्यक्त केला. हे तीन पिढ्या चालू आहे. त्याचा परिणाम काही वर्षापूर्वी आलेल्या संकटातून आपली बँक सुरक्षित बाहेर पडली. तत्कालीन संचालक व पदाधिकाऱ्यांचे यात मोठे योगदान आहे. हीच परंपरा चालवत, नागरिकांचा वाढता विश्वास मिळवत आजचे व उद्याचे संचालक व पदाधिकारी शताब्दीकडे यशस्वी वाटचाल करतील हा विश्वास आहे.

बँकेचे आजचे पदाधिकारी, संचालक, बँकेतील अधिकारी वर्ग व सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन व शुभेच्छा!



**मा. श्री. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे**
अध्यक्ष
भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद

जनता सहकारी बँक लिमिटेड, पुणे ही समाज कार्यात रुजलेली एक प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित सहकारी संस्था आहे. गेल्या ७४ वर्षात या बँकेने व्यवसायाचा विस्तार करताना ग्राहक संपादन आणि ग्राहकांचे समाधान या क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे.

सहकारी बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या जनता बँकेचे अमृत महोत्सवी वर्षात पर्दापण होत असल्याचे वृत्त आनंददायी आहे. अमृत महोत्सवी वर्षाच्या शुभारंभा निमित्त बँकेची गृहपत्रिका, गरुडझेप याचा विशेषांक प्रकाशन या संदर्भातले पत्र देखील प्राप्त झाले आहे.

जनता सहकारी बँक, पुणे ह्या सारख्या संस्थांची निर्मिती आणि यशस्वी वाटचाल आपल्या राज्यात असलेली सहकाराची परंपरा जोपासण्यासाठी अत्यावश्यक आहे.

मला खात्री आहे की यंदाच्या विशेष अंकाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळेल. पुनश्च एकदा, हे अमृत महोत्सवी वर्ष यशस्वीपणे पार पडो व या बँकेच्या समाज कार्याचा लाभ सामान्य जनमानसाला मिळत राहो ही सदिच्छा. आपणा सर्वांचे हार्दिक अभिनंदन!



**मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग,
संसदीय कार्ये महाराष्ट्र शासन

आपली सर्वांची हक्काची जनता सहकारी बँक, पुणे अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याचे ऐकून अतिशय आनंद झाला. माझेही या बँकेशी अनेक वर्षांपासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यामुळे बँकेच्या सर्व सभासदांना, ठेवीदारांना आणि संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांना माझ्या शुभेच्छा देतो.

रा.स्व. संघाच्या विचारातून प्रेरणा घेऊन समाजातील दुर्बल घटकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या बँकेचा आज विस्तार पाहून बँक आपला उद्देश समर्थपणे पूर्ण करीत असल्याचे सर्वांनाच प्रतित होत आहे. बँकेने महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये आज आपला विस्तार केला आहे. बँकेच्या या यशस्वी वाटचालीत बँकेचे सर्व सभासद व ठेवीदार बँकेचे आजी माजी संचालक, अधिकारी आणि सेवक वर्ग अशा सर्वांचाही मोलाचा वाटा राहिलेला आहे.

आजच्या अधुनिक युगात बँकेनेही अद्ययावत तंत्रज्ञानाला आपलेसे मानून आपली विस्ताराची घोडदौड सुरु ठेवली आहे. यामध्ये आपल्या सर्व सभासदांना राष्ट्रीय बँकांप्रमाणे सेवा उपलब्ध करुन दिल्याने बँकेला मोठा लाभ झाला आहे. नव्या युगात नवी आव्हाने स्विकारुन जनता बँकेने अशीच उत्तरोत्तर आपली वाटचाल कायम ठेवावी आणि बँकेने प्रगतीचे नवनवीन उच्चांक गाठावेत अशा माझ्या शुभेच्छा आहेत.

बँकेच्या अमृतमहोत्सवासाठी आणि पुढील वाटचालीसाठी माझ्या पुन्हा एकदा शुभेच्छा आहेत. धन्यवाद्!



**मा. श्री. नानासाहेब आण्णाजी जाधव**
प्रांत संघचालक
पश्चिम महाराष्ट्र, रा.स्व.संघ

आपली जनता सहकारी बँक ऑक्टोबर १९४९ साली संघाच्या काही स्वयंसेवकांनी समाजातील मान्यवरांना बरोबर घेवून स्थापन केली. याच बँकेच्या आपण 'अमृत महोत्सवी वर्षा' च्या संपन्नतेची सुरुवात दिनांक १८ ऑक्टोबर २०२३ रोजी करीत आहात ही अत्यंत आनंदाची आणि स्वाभिमानाची गोष्ट आहे. आपल्या या संस्थेच्या माध्यमातून आपण ज्यांना ज्यांना आपला उद्योग, व्यवसाय, निवास, सुख सुविधांची आवश्यकता होती व पुढील काळात ही आवश्यकता लागणार आहे, अशांना तत्पर, उत्कृष्ठ आणि निरपेक्ष सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे आणि देत रहाल.

जवळपास गत ७४ वर्षांची वाटचाल करीत असतांना आलेल्या सर्व प्रकारच्या अडचणीवर मात करीत पुढील वाटचाल यशस्वीपणे आपण करीत आहात यातून नागरी सहकारी बँकांच्यासमोर आपण 'दिपस्तंभा' प्रमाणे उभे ठाकला आहात. यासाठी बँकेचे सभासद, भागभांडवलदार, संचालक कर्मचारी इत्यादी संबंधितांनी प्रसंगी झीज सोसून आपआपला वाटा उचललेला आहे. वेळोवेळी बँकिंग क्षेत्रातील नियम व अटी यांच्या अधिन राहून बँकेसह सर्वांचे हित जपत मार्गक्रमण करीत आपण यशस्वीतेचा एक महत्वपूर्ण टप्पा पार केला आहे. हे निश्चितच स्पृहणीय आणि अनुकरणीय आहे.

७५ वर्षाच्या अमृतमहोत्सवी पदार्पणानिमित्त आपण 'गरूडझेप' हा विशेषांक प्रकाशित करीत आहात. या विशेषांकाशी संबंधीत सर्वांना शुभेच्छा देत असतांनाच बँकेची अशीच उत्तरोत्तर प्रगती व्हावी ही सदिच्छा व्यक्त करतो. आर्थिक संचातील नागरी सहकारी बँकासाठी मैलाचा दगड ठरुन एका मार्गदर्शकाची भुमिका आपण सर्वजण निभावून न्याल हा विश्वास व्यक्त करुन पुन्हा एकदा या अमृतमहोत्सवी वर्षाची सुरुवात होत असल्याच्या निमित्त शुभेच्छा देतो.

धन्यवाद ! वंदे मातरम्



**मा. श्री. रविंद्र वंजारवाडकर**
संघचालक, रा.स्व.संघ
पुणे महानगर

जनता सहकारी बँक संस्थापकांपासून ते आजपर्यंत योगदान देत असलेल्या संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांमुळे अमृत पर्वात प्रवेश करीत आहे. हि विशेष आनंदाची बाब आहे.

संघ विचाराने विविध क्षेत्रात काम उभे करणाऱ्या प्रयत्नातील एक उत्तम व यशस्वी प्रयोग म्हणून जनता बँकेकडे पाहाता येईल. आर्थिक क्षेत्रात पारदर्शकतेचा व सामाजिक संवेदनेचा एक मानदंड आपल्या बँकेने प्रस्थापित केला आहे. म्हणूनच बऱ्या व वाईट अशा दोन्ही काळात समाजाच्या विश्वासाच्या आधारावर बँकेने आपली वाटचाल सुरु ठेवली.

आज बँकिंग क्षेत्रातल्या गुणवत्तेच्या प्रणाली, आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षित मनुष्यबळ व विश्वस्त भावना या चतु:सूत्रीच्या आधारे आपली बँक उत्तरोत्तर प्रगती करीत आहे. भावी काळातही असेच पारदर्शकतेने विश्वासाने आपले पाऊल पडावे यासाठी हार्दीक शुभेच्छा!



**पद्मश्री गिरीश प्रभुणे**
अध्यक्ष, क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती, चिंचवडगांव

महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात तसेच सामाजिक क्षेत्रात अत्यंत स्पृहणीय काम करणारी बँक म्हणून जनता सहकारी बँक पुणे चा नावलौकिक आहे. ७५ वर्षांपूर्वीचा काळ अत्यंत भीषण स्थितीचा. मध्यमवर्गीय समाजात स्वातंत्र्यानंतर खूपच हालाखीची स्थिती होती. अशा काळात मा. मोरोपंत पिंगळे यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात अनेक संस्था उभ्या राहिल्या. काही जुन्या संस्थांना चालना मिळाली त्यात जनता सहकारी बँक अग्रणी आहे. संघ बंदी नंतरचा काळ हा संघ स्वयंसेवकांना अत्यंत कठीण असा होता. या काळात संघ स्वयंसेवकांना आधार देणारी एकमेव संस्था.
महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळासारख्या अनेक कठिण प्रसंगात जनता बँकेने आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी केलेले काम उल्लेखनीय आहे. यमगरवाडी सारख्या सामाजिक प्रकल्पाच्या उभारणीत जनता सहकारी बँक पुणे चे योगदान विसरण्यासारखे नाही. अत्यंत मागास भागातील मागास समाजातील मुले आणि मुलींचे जीवन बँकेच्या सहकार्याने उजळून निघाले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दीच्या वर्षी दलित रंगभूमी (प्रबुद्ध रंगभूमी) यांना बँकेने केलेले अर्थ सहाय्य हे बँकेची सामाजिक क्षेत्रातील समस्या सोडविण्याची तळमळ यातून दिसून येते.
आज बँक ७५ व्या वर्षात पदार्पण करीत असताना असे अनेक प्रसंग आठवतात. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरु असताना या अमृत काळात जनता सहकारी बँकेने आपली वाटचाल शतक महोत्सवाकडे सुरु केलेली आहे. हे अभिमानास्पद आहे. बँकेचे अनेक हयात आणि दिवंगत संचालकांचे बँकेच्या उत्कर्षात बहुमोल योगदान आहे त्या सर्वांना अभिवादन... धन्यवाद !



**पद्मश्री डॉ. मिलींद प्रल्हाद कांबळे**
संस्थापक अध्यक्ष डिक्की
चेअरमन, गव्हर्निंग बोर्ड आयआयएम जम्मू

जनसामान्यांची बँक म्हणजेच जनता सहकारी बँक लिमिटेड पुणे.
गेल्या ७५ वर्षातील बँकेची वाटचाल अभिमानास्पद आहे.
विविध योजना व सेवाच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांचा विश्वास संपादन करुन खातेदार व ठेवीदार यांना उत्तम सेवा देण्यात आली.
सर्वसामान्यांच्या मनातील आपले स्थान असेच अढळ राहो तसेच उत्तरोत्तर बँकेची भरभराट होवो, ही सदिच्छा!
अमृत महोत्सवानिमित्त सचोटीने व्यवहार करणारे सर्व कर्मचारी, व्यवस्थापक तसेच संचालक मंडळ यांस मनःपूर्वक शुभेच्छा!



**मा. श्री. जगदिश कदम**
सीएमडी- राजपथ इन्फ्राकॉन प्रा. लि.
गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर

जनता सहकारी बँकेच्या अमृत वर्षारंभानिमित्त मनःपुर्वक शुभेच्छा! मी जनता सहकारी बँकेच्या परिवारातीलच एक घटक या नात्याने आपली जनता बँक आकाशामध्ये भरारी घेणाऱ्या गरुड पक्षासारखी उंच झेप घेत भविष्यात अनेक शिखरे पादाक्रांत करेल यात शंका नाही.
१८ ऑक्टोबर १९४९ च्या स्थापना दिनापासून सुसंस्कृत समाज घडविणाऱ्या राष्ट्र निर्माणाच्या पवित्र कार्यात झोकून दिलेल्या ध्येयवेड्या सदगृहस्थांनी बँकेची भक्कम पायाभरणी केली. पुढील काळात समोर आलेल्या अडचणींवर मात करित पुढच्या पिढींनी त्यावर यशस्वी इमले रचले. या मातृसंस्थेत माझा सभासद, खातेदार ते संचालक पदापर्यंत अनेक दशकांचा संबंध आला. कळत नकळत त्याचे संस्कार झाले. विपरीत परिस्थितीत उल्लेखनीय कार्याची सवय झाली. त्यातुनच पुढे भारतात प्रथमच पायाभूत सुविधा क्षेत्रामध्ये गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आम्ही राजपथ इन्फ्राकॉन कंपनीच्या वतीने केले. या कार्यात बँकेचा सहभाग अधिक मोलाचा होता.
छोट्या लोकांची मोठी बँक हा नावलौकीक असलेल्या जनता सहकारी बँकेच्या अमृतकाळातील वाटचालीस माझ्या खूप शुभेच्छा!



**मा. डॉ. अरुणाताई ढेरे**
विख्यात लेखिका

एखाद्या वित्तीय संस्थेशी व्यवहारापलिकडे जात खातेदारांशी भावनिक बंधही निर्माण करावे, हा माझ्यासारख्या अनेकांसाठी थोडा नवलाचा, पण आनंदाचा अनुभव असेल.
जनता सहकारी बँकेशी असलेले बहुतेक खातेदारांचे संबंध व्यवहाराच्या पातळीवर उत्तम आहेतच आणि तत्पर सेवा, सौजन्यशील वर्तन, चोख व्यवहार आणि खातेदारांच्या हितरक्षणाची स्वयंस्फूर्तीने स्वीकारलेली जबाबदारी, यांचा विश्वासार्ह अनुभव तर बँकेकडून मिळतोच आहे, पण त्याही पलीकडे जाऊन जीवनस्नेही म्हणून बँकेने खातेदारांच्या दैनंदिन आयुष्यात वेगळे स्थान मिळवले आहे.
अमृत महोत्सवी वर्षात बँक आता पदार्पण करते आहे. सहकारी बँकिंग क्षेत्रात तिने अग्रमानाची जागा प्राप्त केली आहे. आर्थिक क्षेत्रातील तिची प्रगती उत्तरोत्तर वाढती राहो आणि आपले संचित अधिकाधिक उज्ज्वल करत बँक शतायु होवो, अशी हार्दिक शुभकामना !



**सी.ए. डॉ. विनायक म. गोविलकर**
प्रसिद्ध अर्थतज्ञ

जनता सहकारी बँकेच्या वाटचालीतील ७५ वा वर्धापन दिन हा एक मोठा, अभिमानाचा आणि आणखी मोठी झेप घेण्याचा टप्पा आहे. सचोटी, नाविन्य आणि समर्पणाने सेवा देण्याची सुरुवात करुन ७५ वर्षे झाली. ग्राहकांच्या सतत बदलणाऱ्या आणि वाढणाऱ्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपली बँक कार्यरत राहिली. बँकेचा ग्राहककेंद्री दृष्टीकोन, तंत्रज्ञानाच्या प्रगतीत आघाडीवर राहण्याचा प्रयत्न, विवेकपूर्ण आर्थिक व्यवस्थापन आणि समुदाय प्रतिबद्धता या जोरावर बँकेने आर्थिक वादळाशी समर्थपणे सामना करीत सुरक्षित बँकिंग वातावरण कायम टिकवून ठेवले. या साठी बँकेचे संचालक, अधिकारी आणि कर्मचारी या सर्वांचे योगदान लक्षणीय आहे. अशीच उत्तरोत्तर प्रगती करीत बँकेच्या सर्व स्टेकहोल्डर्स चे समाधान आपल्याकडून साधले जावो ही शुभेच्छा !



**पद्मभूषण डॉ. विजय भटकर**
महाराष्ट्रभूषण, विख्यात संगणक तज्ञ

जनता बँकेने २००५ साली कोअर बँकिंग सोल्युशन व डेटा सेंटर कार्यान्वित केले. तसेच २००७ साली आय.एस.ओ. ९००१/२७००१ मानांकने प्राप्त केली. बँकेचा हा सर्व प्रवास मी जवळून बघितलेला आहे. अमृत महोत्सवामध्ये बँक तंत्रज्ञानातील प्रगती अशीच उत्तरोत्तर होत रहावी यासाठी माझ्याकडून बँकेच्या अमृत महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



**मा. श्री. डॉ. अनंत पंढरे**
Trustee: BAVP
Medical Director : Dr. Hedgewar Hospital
Chairman: Siu-ka-pha Hospital, Sivasagar, Assam
Director : ShriRamchandra Institute of Medical Sciences (SRIMS)
National Vice Chairman Indian Red Cross Society

जनता बँकेसोबतचे ऋणानुबंध डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या जन्मापासूनचे आहेत. जनता बँकेने विचारपूर्वक पण सहज केलेली अगदी सुरुवातीची मदत आम्ही विसरूच शकत नाही. तेव्हापासून आज ३३ वर्षांनी सुद्धा जनता बँक आम्हाला आमचीच वाटते, योग्यवेळी योग्य सहकार्य देणारी आहे. डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या प्रगतीमध्ये सक्रिय भूमिका निभावणाऱ्या जनता बँकेस पुढील वाटचालीकरिता हार्दिक शुभेच्छा !



**मा. श्री. सूर्यकांत पाठक**
राष्ट्रीय उपाध्यक्ष,
अखिल भारतीय ग्राहक पंचायत

स्वर्गीय श्रद्धेय मोरोपंत पिंगळे यांच्या प्रेरणेने १८ ऑक्टोबर १९४९ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काही स्वयंसेवकांनी एकत्र येऊन सर्वसामान्य नागरिकांसाठी जनता सहकारी बँकेची स्थापना केली त्याला आता ७५ वर्ष होत आहेत.

जनता सहकारी बँक ही केवळ ठेवी स्वीकारणे आणि लोकांना कर्ज देणे इतक्या मर्यादित अर्थाने बँकिंग क्षेत्रात काम करत नसून काही नीतिमूल्यांची, राष्ट्रीय विचारांची आणि परंपरांची जोपासना व्हावी व ती लोकांच्यापर्यंत पोहोचवावी या उद्देशाने गेली अनेक वर्ष विविध उपक्रम करीत आहेत. त्याच बरोबर आधुनिक बँकिंग व्यवसायात आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा व प्रणाली याचा बँकेने स्वीकार केला आहे.

जनता सहकारी बँक आणि ग्राहक पेठ को.ऑप.डिपार्टमेंटल स्टोअर तसेच अखिल भारतीय ग्राहक पंचायत, ग्राहकहित इ. ग्राहक परिवारातील सर्व संस्थांचे अर्थपूर्ण स्नेहसंबंध गेली ४९ वर्षांहून अधिक काळ राहिले आहेत. सामान्य नागरिकाला स्वतःच्या पायावर उभं करण्यासाठी अर्थपूर्ण सहाय्य करणारी बँक म्हणून जनता बँकेचा लौकिक आहे आणि याच प्रेरणेतून या बँकेच्या स्थापनेनंतर ठाणे जनता सहकारी बँक, जनसेवा सहकारी बँक, सोलापूर जनता सहकारी बँक इ. बँका त्या त्या विभागात त्या त्या कार्यकर्त्यांनी सुरु केल्या.

बँकेच्या अमृत महोत्सवानिमित्त अखिल भारतीय ग्राहक पंचायत, ग्राहक पेठ, ग्राहकहित व ग्राहक परिवारातर्फे मनापासून शुभेच्छा! बँकेची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो ही सदिच्छा!



**मा. श्री. रविंद्र मुळे**
विख्यात स्तंभ लेखक, चार्टर्ड इंजिनिअर

सहकारी आर्थिक संस्था या एका अर्थाने सहकाराचे मंदिर आहे. जिथे सहकार्याचा सुगंध आणि समृद्धीचा प्रकाश दरवळत रहावा, अशी अपेक्षा असते.

जनता सहकारी बँक या संस्थेत आल्यानंतर या वरील वाक्याची प्रचिती येत राहते. यासाठी अर्थात संचालक आणि कर्मचाऱ्यांना निरांजनातील तेल व्हावे लागते. वातीसारखं जळावे लागते, कापरासारखे जीवन समर्पित करावे लागते.

या साठी लोकांच्या संपत्तीचे विश्वस्त बनावे लागते.

बँकेच्या अडचणीच्या काळातून बाहेर पडून पुणे जनता सहकारी बँक आता गरुड झेप घेण्यास सिद्ध झाली आहे. बँक अमृत महोत्सवी वर्षात प्रवेश करीत आहे हा सर्वांच्या अभिमानाचा विषय आहे. सहकारी चळवळी वरील विश्वास वाढवणारी ही गोष्ट आहे.

बँकेच्या प्रगतीचे श्रेय सर्व बँकेचे संचालक आणि सेवाभावी कर्मचारी, अधिकारी वर्गाला जाते. त्या सर्वांचे अभिनंदन !

बँकेच्या भावी वाटचालीस खूप खूप शुभेच्छा !



**न्यायमूर्ती(से.नि.)श्री.अंबादास ह. जोशी**
लोकायुक्त, गोवा राज्य

१८.१०.२०२३ रोजी जनता सहकारी बँक परिवार आपल्या अधिकोशाच्या अमृतकालिक वर्षामध्ये प्रवेश व प्रगतीपथावरुन वाटचाल आरंभ करणार आहे, हे आनंदाचे वृत्त कळाले.
जनता सहकारी बँके च्या अंबेजोगाई शाखेच्या स्थापनेपासून आपल्या कार्याचा व वाटचालीचा मी माझ्या तरुण वयापासून प्रत्यक्षदर्शी आहे.
संस्कारासह अर्थकारणाच्या मार्गक्रमणात व अनुभवातून शिकणे व अर्थकारणाच्या व्यवस्थापनातील तारेवरची कसरत यामधे आपल्या अधिकोशाचे कार्य व प्रगती हा एक वस्तुपाठच आहे. या वाटचालीस व प्रगतीच्या सातत्यास माझ्या मनापासून शुभेच्छा !



**मा.श्री. ॲड. सुभाष मोहिते**
अध्यक्ष,
पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन

जनता सहकारी बँक पुणे, या आपल्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या संस्थेस दिनांक १८ ऑक्टोबर २०२३ रोजी ७४ वर्ष पूर्ण होत असून अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. जनता सहकारी बँकेची स्वतःची वेगळी अशी ओळख आहे. संस्कृती आहे त्यानुसार जनता सहकारी बँकेचे कामकाज चालू आहे व बँकेस वेळोवेळी लाभलेले सक्षम नेतृत्व याचे जोरावर बँकेने नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे जडणघडणीमध्ये जनता सहकारी बँकेचा व पदाधिकाऱ्यांचा समावेश राहिलेला आहे. जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवाच्या निमित्त पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या वतीने हार्दिक शुभेच्छा! बँकेची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो ही सदिच्छा!



**मा. विनयाताई मेहेंदळे**
कार्यवाह, संपादक गीतादर्शन मासिक

जनता सहकारी बँकेचा आणि आमच्या घराचा संबंध अगदी बँकेच्या स्थापनेपासून आहे. माझी आजी राष्ट्र सेविका समितीच्या द्वितीय प्रमुख संचालिका वंदनीय सरस्वतीबाई तथा ताई आपटे यांचा सेव्हिंग अकौंट नं १ होता. त्यानंतर माझे वडील वसंतराव आपटे बँकेचे चेअरमन होते बँकेच्या प्रगतीचा चढता आलेख मी पहात आले आहे. आज गीताधर्म मंडळात काम करत असताना बँकेमार्फत सर्व व्यवहार विश्वासाने चालू आहेत. बँकेच्या उज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!



**मा.सौ. आशा खाडिलकर**
विख्यात गायिका

महाराष्ट्रातील सहकारी बँकिंग क्षेत्रात प्रत्येक माणसाच्या मनात आपुलकीचे आणि परम विश्वासाचे स्थान भूषविणारी आपली जनता सहकारी बँक लि. पुणे ही बँक दि. १८ ऑक्टोबर २०२३ रोजी आपल्या यशस्वी कारकिर्दीच्या 'अमृत महोत्सवी ' वर्षात पदार्पण करीत आहे याचा आम्हाला मनःपूर्वक आनंद आणि अभिमान आहे. भारतात विशेषतः महाराष्ट्रात सहकाराचे कार्य फार मोठे आहे. त्या स्पर्धात्मक सहकार क्षेत्रात आपल्या विश्वासपूर्ण कार्याच्या योगदानाने अव्वल श्रेणीत टिकून राहणे ही खरोखर कौतुकाची आणि आत्मसन्मानाची घटना आहे. खातेदारांशी आपुलकीच्या नात्याने वागून आपल्या जनता बँकेने ते स्थान प्राप्त केले आहे. संस्थेचा 'अमृत महोत्सव' हा तिच्या शिरपेचातील सन्मानाचा तुरा असतो. त्या यशामध्ये आपल्या बँकेतील कार्यतत्पर अधिकारी आणि सर्वच कर्मचाऱ्यांचा वाटा मोलाचा असतो. आम्हांला तो गोड अनुभव आपल्या विलेपार्ले पूर्व येथील शाखेमधून नेहमीच येत असतो.
आपल्या जनता सहकारी बँक, पुणे चे कार्य प्रतिदिनी असेच वर्धिष्णु होत राहो आणि शतक महोत्सवाकडे आपली घोडदौड वेगाने होत राहो. ही हार्दिक शुभेच्छा!



**मा. श्री. संजय भोसले**
उपाध्यक्ष, इस्कॉन पुणे

इस्कॉन ही संस्था गेली पाच दशके सनातन धर्माचा प्रसार व विविध समाजोपयोगी कार्ये ८५० मंदिरांच्या मार्फत १८० पेक्षा जास्त देशांमध्ये करीत आहे.
मागील करोना तसेच अनेक आपत्तींच्या काळात इस्कॉन या संस्थेने समाजातील सर्व स्तरातील बंधू भगिनी यांचे साठी परमेश्वरी कार्य या भावनेने मदत केलेली आहे आणि हे कार्य निरंतर चालू राहणार आहे. जनता सहकारी बँकेनेही असेच परमेश्वरी कार्य म्हणून १९९३ चा लातूरचा भूकंप असो वा चिपळूण, कोल्हापूर / सांगली मध्ये आलेला महापूर असो जनता बँकेने केलेले मदतीचे निश्चित असे योगदान सर्व समाजाला दिसून आलेले आहे. फक्त आर्थिक विषय एवढाच केंद्रस्थानी न ठेवता जनता बँकेने समाजाविषयी असलेला आपलेपणा सदैव जपला आहे त्यामुळे जनता सहकारी बँक ही आम्हाला आपली बँक वाटते.
अशी समाजाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम असणारी जनता सहकारी बँक ही अमृत महोत्सवात पदार्पण करीत आहे, त्याबद्दल बँकेला पुढील वाटचालीसाठी मनः पूर्वक शुभेच्छा!

# जनता सहकारी बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

## ठेव योजना

**बचत ठेव**
**सुकुमार बचत ठेव**
**चिरंजीव बचत ठेव**

**करंट अकाऊंट,**
**स्वधन डिपॉझिट,**
**डिलक्स करंट अकाऊंट**
**एस्क्रो रेरा अकाऊंट**

**रिकरिंग डिपॉझिट**
**मासिक व्याज, त्रैमासिक व्याज, पुनर्गुंतवणूक ठेव योजना**

## रिटेल/कमर्शिअल कर्ज योजना

**जनता गृहकर्ज योजना**

**जनता वाहन कर्ज योजना**
(चारचाकी व दुचाकी)

**जनता एज्युफ्लेक्स कर्ज योजना**

**सोने तारण कर्ज योजना**

**Cash Credit, Loan Against Existing Proprety, Plant & Machinery Loan, Commercial Vehicle Loan**

### कॅशलेस व्यवहारांसाठी ...

- Using Online Internet Banking
- Platinum Debit Card
- E-Commerce
- UPI Bhim Jet Pay
- Statement on E-mail
- IMPS • QR Code
- Bharat Bill Payment System

### इन्श्युरन्स सुविधा

- लाईफ इन्श्युरन्स आणि हेल्थ इन्श्युरन्स
- पर्सनल ॲक्सिडेंट इन्श्युरन्स
- वाहन, प्रॉपर्टी आणि मशिनरी इन्श्युरन्स
- म्युच्युअल फंड

### सामाजिक सुरक्षा योजना

Atal Pension Yojana

- अटल पेन्शन योजना
- प्रधानमंत्री सुरक्षा वीमा योजना
- प्रधानमंत्री जीवन ज्योती वीमा योजना

**गरुड झेप**

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा. दूरध्वनी : ०२०-२४४०४४८३

प्रकाशन दिनांक : १८ ऑक्टोबर २०२३